Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# सर्वसमावेशक शिक्षण : एक ध्यास

श्रद्धा सुपडू शेळके
संशोधक विद्यार्थिनी

**' गुरुजनी ऐसे द्यावे धडे**
**आपला आदर्श ठेवोनी पुढे ।**
**विद्यार्थी होतील आदर्श चहूकडे**
**राष्ट्र होईल तेजस्वी '**

प्रत्येक मूल जन्माला येतं ते स्वतःच वेगळपण घेऊनच त्याच्या क्षमतेनुसार समर्थपणे जगण्याची संधी त्याला मिळायला हवी. शिक्षणातून या संधीची अनेक दालने खुली होण्यास निश्चित मदत होत असते. म्हणूनच किमान प्राथमिक शिक्षण मिळणं हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे. हा क्रम आपण आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीच्या संदर्भाने नीट समजून घेतला असेल तर, मुलांना वयानुरुप दाखल करण्याची अपरिहार्यता आपल्याला मनातून पटेल.

भारत सरकारने ०१ एप्रिल, २०१० पासून 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९' जम्मू-काश्मीर वगळता संपूर्ण देशभर लागू केला. या कायदयाने मुलांना शिक्षणाचा हक्क प्राप्त झाला आहे. कायदयातील कलम ४ नुसार शाळाबाहय तसेच शाळा सोडून गेलेल्या मुलांना वयानुरुप समकक्ष वर्गात प्रवेश दयावयाचा आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर त्यांना विशेष शिक्षण देवून त्यांची अध्ययन पातळी वर्गातील नियमित विद्यार्थ्यां बरोबर आणावयाची आहे. मुलांच्या अध्ययनातील अनुशेष भरुन काढायचा आहे. मु लांच्या शिक्षणाची जबाबदारी कायदयाने निश्चित केल्यामुळे हे काम सामाजिक जाणिवेतून करुन वेगाने पुढे नेण्याची गरज आहे.

मुलं म्हणजे आपली राष्ट्रीय संपत्ती मुलांच शिक्षण आणि व्यक्तिमत्व विकास म्हणजे राष्ट्राच्या भावी विकासाची पायाभरणी म्हणून प्रत्येक मूल शाळेत आणावे, रमवावे टिकवावे आणि चांगले शिकवावे हा आपला एकमेव ध्यास आहे. त्यासाठी आनंदाने मनापासून काम करणे आवश्यक आहे. 'कामातून आनंद आणि आनंदाने काम' हेच आपले जीवन ध्येय बनावे. शैक्षणिक गुणवत्ता विकास आणि वैयक्तिक व आत्मिक समाधानासाठी आत्मप्रेरणेने या कामाकडे वळावे. शाळा म्हणजे मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाचे प्रमुख ठिकाण परंतु याच ठिकाणापासून दूर असलेले काही विद्यार्थी आपल्या निदर्शनास येतात. असे झाल्यास सजम व भावी आव्हाने पेलणारे नागरिक कसे निर्माण होतील. 'नित्य नवा दिवस जागृतीचा' समजून कार्य करावे लाज्जार आहे. शाळा बाहय मुलांच्या शैक्षणिक गरजा "पिंडे पिंडे मतर्भिन्ने" या तत्वानुसार विचार करुन वैयक्तिक स्तरावर सोडविणे आवश्यक आहे. शाळाबाहय मुलांच शाळेत येणे घर, मित्रपरिवार, शाळा व समाजाच्या प्रतिसादावर अवलंबून आहे. मुलांना शाळेत आणणे, टिकविणे, दर्जेदार शिक्षण देणे व गुणवत्ता वाढविणे यासाठी शासन स्तरावरुन, काही समाज सुधारकांकडून तसेच काही स्वयंसेवी संस्थांकडून सातत्याने प्रयत्न झाले आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादींनी शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. अलीकडील काळात अनुताई वाघ, ताराबाई मोडक यांसारख्या महिलांनाही दुर्गम भागातील वंचित मुलांच्या शिक्षणासाठी कसोशीने प्रयत्न केले आहेत. भारतीय राज्य घटनेनुसार ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे. त्यानुसार राज्य घटना अस्तित्वात आल्यानंतर विविध कृती ज ार्यक्रमांद्वारे प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचा प्रयत्न झाला. विशेष कृती कार्यक्रमांची अंमलबजावणी करुन शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे प्रयत्न आत्ता पर्यंत झाले.

सर्व शिक्षा अभियान सुरु झाल्यापासून मुलांना पर्यायी शिक्षणाची सोय उपलब्ध करुन शाळाबाहय मुले शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न झाले व ते प्रयत्न अजुनही सुरु आहेत. साखर शाळा, भोंगा शाळा, कुरण शाळा, पाषाण शाळा, अंशकालीन शाळा यांच्या माध्यमातून स्वयंसेवी संस्थानीही मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून वस्ती शाळा, महात्मा फुले शिजज हमी ज़ें द्र, ि‍नवासी-अनिवासी सेतू शाळा, राजीव गांधी संधी शाळा, कस्तुरबा गांधी बालिका विदयालय यासारख्या योजनांद्वारे शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. ६ ते १४ वयोगटातील मुलांच्या जुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मोफत पाठयपुस्तके, गणवेश, लेखन साहित्य, प्रवास, तसेच शिष्यवृत्ती, उपस्थिती भता, प्रोत्साहन भत्ता व मध्यान्ह भोजन इत्यादींची उपलब्धता करुन दिली जात आहे. एवढे करुनही अजून बरीच मुले शाळाबाहय आहेत. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची दर्जेदार शिक्षण देण्यासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ लागू केला आहे. यानुसार शाळाबाहय, मध्येच शाळा सोडून गेलेल्या व अन्य मुलांना वयानुरुप समकक्ष वर्गात प्रवेश दिला जात आहे. शासनास ही जबाबदारी शाळा व समाज यांच्या साहाय्याने पूर्ण करावयाची आहे. यासाठी शाळाबाहय मूल म्हणजे काय? शाळाबाहय मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात कसे आणता येईल? या मुलांचे प्राथमिक शिक्षण कसे पूर्ण करायचे? ज ायदयात या मुलांच्या शिक्षणासाठी कोणकोणत्या तरतुदी आहेत? या सर्व प्रश्नांचा आपणांस विचार करावा लागणार आहे. या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांना टिकवून ठेवण्यासाठी तसेच दर्जेदार शिक्षज देज्यासाठी विविध घटकांची भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. आजही सर्व प्रकारच्या उपाय योजना करुन देखील लाखाच्या घरात मुले प्राथमिक शिक्षणापासून वंचित आहेत असे सर्वेक्षणाच्या आधारे आढळले आहे. या मुलांना प्राथमिक शिक्षणाची संधी देऊन प्राथमिक शिक्षणाच्या १००% सार्वत्रिकीकरणासाठी त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही अपरिहार्य बाब ठरली आहे.

जैरहजर मुलां पैकी काही मुलं दीर्घकाल अनुपस्थित असतात ही मुलं वर्षभरात १०-१२ दिवस शाळेत येत असावी. त्यांना सतत गैरहजर असे देखील म्हणतात ही दीर्घकाल अनुपस्थित मुले शिक्षणबाहय आणि शालाबाहय आहेत. शिक्षण हक्क कायदयाच्या महाराष्ट्राच्या नियमांनुसार आपण एक महिन्या पेक्षा जास्त सलग गैरहजर असलेल्या मुलांना शालाबाहय म्हणार या सर्व मुलांना शिक्षणात आणायचे आहे. पाच दिवसांपेजा जास्त सलग गैरहजर राहणाऱ्या मुलांना आपण अनियमित म्हणणार. अशी अनियमित मुले अध्ययनात मागे पडू नयेत, शिक्षणबाहय होऊ नयेत म्हणून त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. नियमित शाळैत शिकणारी मुले जर अध्ययनात मागे पडली तर ती सुध्दा हळूहळू अनियमित होतील आणि कधी ना कधी शिक्षण बाहय होतील. म्हणून या सर्व मुलांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

आजच्या स्थितीत काही मुलांची नांवे शाळेत नोंदविली गेलेली नाहीत, काही मुले पटावर असून सुध्दा दीर्घ मुदतीत गैरहजर राहतात. त्यापेक्षा जास्त मुले अनियमित असतात, तर त्याही पेक्षा जास्त मुले नियमित आहेत परंतु ती शिकत नाहीत या चारही प्रकारच्या मुलांवर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

शाळाबाहय मुलांच्या बाबतीत खालील पर्याय संभवतात.

१) अजीबात शाळेत प्रवेश न घेतलेले मूल

२) शाळेत प्रवेश घेतला होता, पण काही इयत्ता शिकून नंतर शाळा सोडली (प्राथमिक शिक्षण पूर्ण जे लेले -नाही)

३) शाळेत नांव आहे पण एक महिन्यापेक्षा अधिक काळ सतत गैरहजर आहे.

मुले शाळेत दाखल न होण्याची कारणे व उपाय.

मुले शिक्षणाच्या प्रवाहाच्या बाहेर असण्याची कारणांची वर्गवारी तीन विभागांत करता येईल.

१) आर्थिक कारणे २) सामाजिक कारणे ३) इतर कारणे.

**१) आर्थिक कारणे.**

* पालकांची आर्थिक स्थिती हलाखीची असणे.
* बालकांना कुटुंबाच्या पारंपारिक व्यवसायास हातभार लावावा लागणे.
* विटभट्टी, हॉटेल यासारख्या ठिकाणी बालकामगार म्हणून काम करणे.
* लहान भावडांचा सांभाळ करण्यासाठी घरी थांबावे लागणे.
* रोजगाराच्या निमित्ताने पालकांसोबत स्थलांतरीत व्हावे लागणे.

**२) सामाजिक ज ारजे.**

* समाजात मुलगा-मुलगी यांच्या बाबत भेदाची भावना असणे.
* पालकांच्या व्यसनाधीनतेमुळे कौटुंबिक वाद उद्‌भवणे.
* बालविवाहा सारख्या अनिष्ट रुढी, परंपरांमुळे शिक्षणात अडथळा निर्माण होणे.
* मुलींच्या बाबत असुरक्षिततेची भावना असणे.

**३) इतर कारणे.**

* शिक्षणा विषयी अनास्था व न्यूनगंड असणे.
* अध्ययन-अध्यापन नीरस असणे.
* शाळा घरापासून दूर असणे.
* शालेय वातावरण पोषक नसणे.
* शारीरिक व्यंग असणे.
* कला कौशल्यांच्या अभिव्यक्तीस संधी न मिळणे.

**४) उपाय योजना.**

* समाजातील सर्व घटकांना शिक्षणाचे महत्व व उयुक्तता पटवून देणे.
* मुलांना घरापासून जवळच्या अंतरावर शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे.
* सूक्ष्म नियोजन करुन सर्वेक्षण करणे व मुलांना दाखल करुन घेणे.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

* पालकांचे प्रबोधन करणे.
* समाजातील विविध घटकांचा सहभाग घेणे.
* शाळेत भौतिक सुविधांसह अध्ययनास पोषक असे वातावरण निर्माण करणे.
* मुलांच्या अडचणी समजुन घेणे, आवश्यक ती मदत करणे.
* वर्गाध्यापन रंजक व आनंददायी करणे.
* मुलांच्या कलागुण अभिव्यक्तीस वाव देणे.
* कृतींवर आधारित अध्ययनाची संधी देजे.
* विशेष गरजा असणाऱ्या मुलांना विशेष सुविधा उपलब्ध करुन देणे.
* स्थलांतरीत कुटुंबातील मुलांची दखल घेऊन त्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे.
* मोफत प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मुलांच्या बाबतीत पालकांची जबाबदारीही महत्वाची आहे.**

मुलांच्या शिक्षणा करिता पालकांनाही जबाबदार धरण्यात यावे. शाळाबाहय मुलांच्या पालकांवर ज ायदेशिर कार्यवाही करुन त्यां-ना शिजा झाल्याचे एकही उदाहरण पाहण्यात नाही. तेंव्हा पालकांना ही शिक्षा झ ााल्यास ते शिक्षेच्या भिती पोटी आपल्या पाल्याला शाळेत पाठवतील. तेंव्हा साम, दाम, दंड अशा सर्व युक्त्या वापराव्यात.

शिजज ां-नाही काही गोष्टी समजून घेण आवश्यक आहे. उघडया भिंतीच्या खुल्या जगात अनुभवातून शिकणं हे आपल्या वर्गातल्या इतर मुलां इतकच किंबहूना त्यापेक्षा जास्त या मुलांच्या बाबतीत घडलेलं असणार, हे आपण लक्षात घेतलं तर आपल्या वर्गा वयानुरुप दाखल झालेलं मूल आपल्याला संकट न वाटता आपल्या आतल्या शिक्षकांसाठी संधी वाटेल केवळ कायदयांन किंवा वरिष्ठांनी सांगितलं म्हणून या मुलां-ना शिकवायचं की आपल्या आतलं शिक्षकपण जागं ठेवत त्यांना आपलंस करायचं, हे विचारपूर्वक ठरवांव आणि कृतीतही आणांव लागेल. शाळेतल शिकवणं हे आपल्यासाठी गरजेची नव्हे तर आनंदाची गोष्ट आहे, हे मनापासून पटायला हंव यासाठी ते आधी मनावर घ्यायला हंव. मनावर घेतलेली कोणतीही गोष्ट केवळ कर्तव्य म्हणून पार पाडली जात नाही, ती मनापासून केली जाते. आपल्यातला 'शिक्षक' जेंव्हा जेंव्हा संपूर्णपणे जागा राहू-न ज ाम करतो तेंव्हा-तेंव्हा त्याचे परिणाम आपल्या अपक्षेच्याही पलीकडे, गुणांच तरी जगणं सुंदर करणारे असतात. कुणा वरिष्ठांच्या शेऱ्यांची, शाबासकीची सर त्या समाधानाला नसते. ते स्वयंभूच असते. आयुष्य -नावाच्या शाळेत लिहिण्या-वाचण्या व्यतिरीक्त बरंच काही शिकून हे मूल आपल्या वर्गात आलेल्यांच भान सतत ठेवून जर व्यक्ती म्हणून आपण त्याला समजून घेऊ शकलो तर आपलं काम सोपं होणार आहे.

' शिजजाचे पाईक आम्ही
जुणवत्ता आमचा ध्यास
विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी
धरतो आम्ही प्रयत्नांची कास.'

*** संदर्भ ***

१) निश्चियाचे बळ
१००% मुलांना शाळेत आणि शिक्षणात कंस आणायचं?
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
प्रथमावृत्ती : मार्च २०११

२) प्रेरणादायी शाळा : विकासाचे निकष
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० (विदया परिषद)
प्रथम आवृत्ती- डिसेंबर २०१०

३) वया-नुरुप समकक्ष वर्गात प्रवेश घेतलेल्या मुलांच्या विशेष शिक्षणासाठी